# नोंदणी महानिरीक्षक कार्यालय पुणे

## ई-रजिस्ट्रेशन

## e-Registration

<u>अनुक्रमणिका</u>


| अ.क्र | | पृष्ठे |
|---|---|---|
| 1.ई-रजिस्ट्रेशन e-Registration | | |
| 1.1 | सर्वसाधारण संकल्पना | |
| 1.2 | सर्वसाधारण कार्यपध्दती | |
| अ | पक्षकारांकडील कार्यवाही | |
| ब | दुय्यम निबंधक यांचेकडील कार्यवाही | |
| 1.3 | कायदेशीर तरतुदी | |
| 1.4 | ओळख पडताळणी | |
| 1.5 | मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व दस्त हाताळणी शुल्काची प्रदाने | |
| 1.6 | दस्त नोंदणीसाठी दस्त हाताळणी शुल्क | |
| 1.7 | फायदे | |
| 1.8 | आवश्यक सर्वसाधारण बाबी | |
| 1.9 | कोणकोणत्या प्रकारच्या दस्तांसाठी | |
| 2. ई-रजिस्ट्रेशन-सदनिका प्रथम विक्रीचे करारनामे | | |
| 2.1 | त्यासाठी आवश्यक निकष व पात्रता | |
| 2.2 | बांधकाम व्यावसायिकाकडे आवश्यक साधनसामूग्री | |
| 2.3 | ई-रजिस्ट्रेशन-सदनिका विक्री करारनाम्यामधील सुरक्षा वैशिष्टये | |
| 2.4 | सूविधा उपलब्ध होण्यासाठी कार्यपध्दत | |
| | 3. परिशिष्टे | |
| 3 | परिशिष्ट 1- ई-रजिस्ट्रेशनची साधारण पध्दत | |
| 4 | परिशिष्ट 2- 'महाराष्ट्र ई-रजिस्ट्रेशन आणि ई-फायलिंग नियम,2013' | |
| 5 | परिशिष्ट 3- **SCREEN SHOTS OF ADHAR MESSAGE** | |
| 6 | परिशिष्ट 4- विक्री करारनाम्या ई-रजिस्ट्रेशन प्रणाली तयार करणे व त्याची चाचणी घेणे याचा कृती आराखडा | |

# **ई-रजिस्ट्रेशन**

# **e-Registration**

## **1.1 ई-रजिस्ट्रेशन सर्वसाधारण संकल्पना :-**

प्रचलित पध्दतीनुसार नागरिकांना त्यांच्या व्यवहाराच्या दस्तांची नोंदणी करून घेण्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रासाठीच्या दुय्यम निबंधक कार्यालयात समक्ष जावे लागते.नागरिकांना आपल्या दस्ताची नोदंणी दुय्यम निबंधक कार्यालयात न जाता ऑनलाईन पध्दतीने घरबसल्या करता यावी याकरीता नोंदणी व मुद्रांक विभागाने, ई-रजिस्ट्रेशन ही प्रणाली विकसित केली आहे.

## **1.2: ई-रजिस्ट्रेशन सर्वसाधारण कार्यपध्दती :-**

1.2.अ.- पक्षकारांकडील कार्यवाही-

या प्रणालीमध्ये पक्षकारांना-

1.त्यांचे दस्त तयार करता येतात, (Preparation of Documents)
2.दस्तासाठीचे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी भरता येते. (Payment of Stamp Duty & Registration Fee)
3.दस्तावर सहया करता येतात. (Execution of Document)
4.दस्तावर सही केल्याचा कबुलीजबाब देता येतो (Admission of Execution)
5.स्वत:ची ओळख पटविता येते. (Identification of Parties)
6.दस्त नोदंणीसाठी सादर करता येतो. (Presentation for Registration)

1.2.ब- दुय्यम निबंधकाकडील कार्यवाही-

याप्रमाणे पक्षकारांकडून ऑनलाईन कार्यवाही झाल्यांनतर, दुय्यम निबंधकाना तो दस्त स्वत:चे कार्यालयात ऑनलाईन पाहणीसाठी उपलब्ध होतो. ई-रजिस्ट्रेशन प्रणालीद्वारे ऑनलाईन प्राप्त झालेले दस्त, प्राप्त झाल्यांनतर, दुय्यम निबंधक त्याच दिवशी तपासतात. तपासणीमध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश असतो-

1. सर्व पक्षकारांचे फोटो व अंगठयाचे ठसे योग्य रित्या आले आहेत
2. दस्तातील नमूद केलेला मजकूर विशेषत: नावे, मिळकत वर्णन, मोबदला इ. वाचनीय व अर्थपूर्ण आहे

3. पक्षकारांची ओळख आधार डेटाबेस बरोबर पडताळली जात आहे

4. दस्तासाठीच्या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ई-पेमेंट द्वारे भरल्याची खातरजमा होत आहे.

या प्रमाणे पडताळणी झाल्यानंतर दुय्यम निबंधक त्या दस्ताची नोंदणी ऑनलाईन पूर्ण करतात. दस्त नोंदणी पूर्ण केल्याबरोबर त्या दस्तऐवजावर त्याबाबतचे प्रमाणपत्र आणि दुय्यम निबंधक कार्यालयाची मुद्रा उमटते तसेच दस्ताची सूची क्र.2 व पावती तयार होते.

दस्त नोंदणीस सादर केल्यांनतर पक्षकारांना आपल्या दस्ताची स्थिती ऑनलाईन पाहता येते.दस्त नोंदणी पूर्ण झाल्याबरोबर नोंदणीकृत दस्ताची प्रत,सूची क्र.2 व पावती ऑनलाईन उपलब्ध होते व ती डाउनलोड करता येते.

दुय्यम निबंधकाना एखादया मुददयांबाबत त्रूटी दिसून आल्यास ती त्रूटी संबंधित पक्षकारांना ऑनलाईन पाहता येते व त्याची पूर्तता करुन दस्त नोंदणीस पुन्हा सादर करता येतो.

यारितीने नोदंणी अधिनियमानुसार आवश्यक ती सर्व प्रक्रिया संपुर्णपणे ऑनलाईन पूर्ण केली जाते. नागरिकांना दुय्यम निबंधक कार्यालयात यावे लागत नाही.

ई-रजिस्ट्रेशनची साधारण पध्दत सोबतच्या परिशिष्ठ 1 मध्ये दर्शविली आहे.

## 1.3 ई-रजिस्ट्रेशन संदर्भात कायदेशीर तरतुदी :-

नोंदणी अधिनियमातील मूलभूत तरतुदीनुसार,दस्त नोंदणीसाठी सादर करणे व सहीचा कबुलीजबाब देणे या कामासाठी संबंधित पक्षकारांना दुय्यम निबंधक यांचेसमोर समक्ष हजर राहणे आवश्यक होते.

ही दोनही कामे दुय्यम निबंधक यांचेसमोर हजर न राहता इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने देखील करता येतील अशी सुधारणा, नोंदणी अधिनियमाचे कलम 32,34 व 35 मध्ये नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) कायदा,2010 अन्वये करण्यात आली आहे. शिवाय, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने दस्त नोंदणी करण्यासंबंधीचे नियम तयार करण्याचे अधिकार कलम 69 मधील सुधारणेन्वये नोंदणी महानिरीक्षक यांना प्रदान करण्यात आले आहेत.

कलम 69 अन्वये प्राप्त अधिकारातून नोंदणी महानिरीक्षक यांनी राज्य शासनाची पूर्वमान्यता घेउन ऑनलाईन दस्त नोदंणी पध्दतीसंबंधी ‘महाराष्ट्र ई-रजिस्ट्रेशन आणि ई-फायलिंग नियम,2013’ तयार केले आहेत.या नियमांना, नोंदणी महानिरीक्षक यांचेकडून दिनांक

2/8/2013 च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. त्याची प्रत सोबत परिशिष्ट 4 मध्ये जोडली आहे.

ई-रजिस्ट्रेशन हे दस्त नोंदणीसाठीचे इलेक्ट्रॉनिक माध्यम असून त्याद्वारे नोंदणी होणा-या दस्तांना पारंपारीक पध्दतीने नोंदणी होणा-या दस्तांप्रमाणेच वैधानिक महत्व व आधार आहे.

## 1.4 ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये ओळख पडताळणी :-

नोंदणी अधिनियमानुसार दस्त नोंदणी प्रक्रियेमध्ये, दस्त निष्पादनाचा कबुलीजबाब देणा-या व्यक्तीची ओळख पडताळणी करणे हा महत्वाचा भाग आहे.

ई-रजिस्टेशन प्रणालीमध्ये याकरीता पक्षकारांचा आधार क्रमांक व अंगठयाचा ठसा प्रणालीमध्ये घेतल्यानंतर या दोन्ही बाबी आधार डेटाबेस (UID Database) कडे पडताळणी करीता पाठविल्या जातात.आधार प्रणालीमध्ये या दोन्ही बाबी जुळत असल्याची खातरजमा होउन, आधार डेटाबेस मधील छायचित्रासह,तसा संदेश ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये उपलब्ध होतो. आधार क्रमांक व अंगठयाचा ठसा जुळत नसल्यास तसाही संदेश प्राप्त होतो.हे दोन्ही प्रकारचे संदेश नमून्यादाखल सोबत परिशिष्ट 2 मध्ये जोडले आहेत.

या प्रकारची पडताळणी ई-रजिस्ट्रेशन करणा-या पक्षकारांना करता येते आणि दस्त नोंदणी पूर्ण करतांना दुय्यम निबंधक यांनाही करता येते. त्यामुळे पक्षकार दुय्यम निबंधक यांचेसमोर प्रत्यक्ष येत नसतांना देखील दस्त नोंदणी करणे या प्रणालीमध्ये शक्य झाले आहे.

## 1.5 मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व दस्त हाताळणी शुल्काची प्रदाने :-

ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये नोंदणी होणा-या दस्ताच्या संदर्भात आवश्यक मुद्रांक शुल्क व नोंदणी फी या दोन्ही रकमा शासनाच्या GRAS प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने प्रदान करावयाच्या आहेत. दुय्यम निबंधकांना या प्रदानाची पडताळणी ऑनलाईन करता येते.

याच धर्तीवर ज्या प्रकारच्या दस्तांसाठी दस्त हाताळणी शुल्क लागू आहे,त्यामध्ये दस्त हाताळणी शुल्क ऑनलाईन भरण्याची सूविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## 1.6 ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये दस्त नोंदणीसाठी दस्त हाताळणी शुल्क :-

पारंपारीक पध्दतीने दस्त नोंदणीमध्ये प्रति पान रुपये 20/- दराने दस्त हाताळणी शुल्क भरावे लागते. ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये-

अ. लिव्ह अन्ड लायसन्स करारनामा नागरिकांनी स्वत: च्या साधनसामूग्रीच्या आधारे नोंदणीसाठी सादर केल्यास दस्त हाताळणी शुल्क नाही.

ब. नागरिकांनी मान्यता प्राप्त सेवा केंद्राद्वारे लिव्ह अन्ड लायसन्स करारनामा नोंदणीसाठी सादर केल्यास उक्त सेवा केंद्रांच्या सेवाशुल्कासह केवळ रुपये 300/- इतके दस्त हाताळणी शुल्क.

क. बांधकाम व्यावसायिक यांनी सदनिका विक्री करारनामे स्वत:च्या साधनसामूग्रीच्या आधारे नोंदणीसाठी सादर केल्यास केवळ रुपये 1000/- दस्त हाताळणी शुल्क.

## 1.7 ई-रजिस्ट्रेशनचे फायदे :-

- पक्षकारांना कोठूनही व केव्हाही दस्त तयार नोंदणी करीता सादर करता येतो.
- दस्त ऑनलाईन तयार होत असल्याने, दस्त तयार करण्यासाठीच्या खर्चात व वेळेत बचत होते.
- पक्षकारांना दुय्यम निबंधक कार्यालयात जावे लागत नसल्याने त्यांच्या प्रवास खर्चात व वेळेत बचत होते.
- गतिमान व पारदर्शक दस्त नोंदणी
- विना कागद दस्त तयार व नोंदणी होत असल्याने पर्यावरण पूरक उपक्रम.
- दस्त हाताळणी शुल्काच्या खर्चामध्ये बचत होते.

## 1.8 ई-रजिस्ट्रेशन साठी आवश्यक सर्वसाधारण बाबी :-

1. संगणक (Computer)
2. इंटरनेट कनेक्टीव्हीटी (Internet Connectivity)
3. थंब स्कॅनर (Biometric Device)
4. वेब कॅमेरा (Web Camera)
5. पक्षकारांचे व त्यांना ओळखणा-या व्यक्तीचे आधार क्रमांक. (UID Number)

(बांधकाम व्यावसायिकांचे संदर्भात MPLS-VPN प्रकारची कनेक्टीव्हीटी आवश्यक, शक्य तो BSNL/MTNL यांना प्राधान्य, शिवाय बांधकाम व्यावसायिक संस्थेतर्फे दस्तावर सही करणा-या व्यक्तीची डिजीटल स्वाक्षरी आवश्यक.)

## 1.9 ई-रजिस्ट्रेशन कोणकोणत्या प्रकारच्या दस्तांसाठी-

ई-रजिस्ट्रेशन ची सूविधा सध्या पुढील प्रकारच्या दस्तांसाठी उपलब्ध आहे.

1. लिव्ह अन्ड लायसन्स करारनामा
2. सदनिकाचे प्रथम विक्री करारनामे
3. म्हाडाकडील अलॉटमेंट लेटर
4. महानगरपालिकांमधील विशिष्ट योजनांच्या लाभार्थ्या बरोबरचे करार.

## 2.ई-रजिस्ट्रेशन-सदनिका प्रथम विक्रीचे करारनामे-

बांधकाम व्यावसायिक आणि सदनिका खरेदीदार यांच्या दरम्यान होणा-या विक्री करारनाम्याच्या नोंदणीसाठी ‘ई-रजिस्ट्रेशन’ ही सूविधा उपलब्ध आहे.

### 2.1 त्यासाठी आवश्यक निकष व पात्रता-

1. गृहबांधणी प्रकल्पास संबंधित सक्षम प्रधिकरण(जसे की, महानगरपालिका, जिल्हाधिकारी, एमएमआरडीए इ.) यांचेकडील बांधकामविषयक सर्व प्रकारच्या परवानग्या आवश्यक.
2. पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक
3. करारनामा नोंदणी होण्यावर शिल्लक किमान 200 सदनिका आवश्यक
4. आवश्यक साधनसामूग्री उपलब्धतेची बांधकाम व्यावसायिकाची तयारी

### 2.2 ई-रजिस्ट्रेशन सूविधा उपलब्ध होण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाकडे आवश्यक साधनसामूग्री-

1.संगणक (Computer)
2.MPLS-VPN इंटरनेट कनेक्टीव्हीटी (Internet Connectivity) (BSNL/MTNL यांचेकडील कनेक्टीव्हीटीस प्राधान्य)
3.थंब स्कॅनर (Biometric Device)
4.वेब कॅमेरा (Web Camera)
5.पक्षकारांचे व त्यांना ओळखणा-या व्यक्तीचे आधार क्रमांक. (UID Number)
6.बांधकाम व्यावसायिक संस्थेतर्फे दस्तऐवजावर सही करणा-या व्यक्तीची डिजीटल स्वाक्षरी

### 2.3 विक्री करारनाम्याच्या ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमधील सुरक्षा वैशिष्टये-

ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये पक्षकारांची ओळख आधार डेटाबेसच्या आधारे पडताळली जाते. त्याशिवाय विक्री करारनाम्याच्या ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमध्ये पुढीलप्रमाणे अतिरिक्त सुरक्षा वैशिष्टये आहेत-

1. प्रणालीचा प्रत्यक्ष वापर सुरु करण्यापूर्वी बांधकाम व्यावसायिक यांच्या अंगठयाचे ठसे विभागाच अधिका-याच्या उपस्थितीत प्रणालीमध्ये घेतले जातात.त्यानंतर प्रणालीचा वापर केव्हाही करण्यासाठी (Login) त्या अंगठयाची ठश्याची पडताळणी केली जाते.

2. बांधकाम व्यावसायिकाने प्रत्येक करारनाम्याच्या बाबतीत दिलेला अंगठयाचा ठसा आधार डेटाबेस बरोबरच,प्रणालीमध्ये साठवून ठेवलेल्या अंगठयाच्या ठशाबरोबर देखील पडताळला जातो.

3. बांधकाम व्यावसायिकाच्या डिजीटल सिग्नेचर शिवाय दस्त नोंदणी होत  नाही.

## 2.4 बांधकाम व्यावसायिकाकडे ई-रजिस्ट्रेशन सूविधा उपलब्ध होण्यासाठी कार्यपध्दत-

1. संबंधित बांधकाम व्यावसायिकाने त्यासाठीचे गृहबांधणी प्रकल्पनिहाय Letter of Willingness नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडे सादर करावे.

2.सदर Letter of Willingness  मध्ये पुढील बाबींचा समावेश असावा-

1.गृहबांधणी प्रकल्पाचा तपशील
2.बांधकाम परवानगीचा तपशील व त्याच्या प्रती
3.पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्राचा तपशील व प्रत
4.ई-रजिस्ट्रेशन करावयाच्या संभाव्य करारनाम्यांची संख्या
5.उपरोक्त नमूद साधनसामूग्री उपलब्ध ठेवण्याची हमी
6.विक्री करारनाम्याचा मसूदा.
7.प्रकल्पामध्ये असलेल्या संकूल/इमारती व त्यामधील गाळे आणि त्यांचे क्षेत्रफळ यांचा प्राथमिक तपशील दर्शविणारा तक्ता.
8.ई-रजिस्ट्रेशन प्रणाली विकसन आणि अंमलबजावणी संदर्भात संपर्कासाठी व्यक्तीचे नाव,दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी
9.कोणत्या कंपनीकडून MPLS-VPN कनेक्टीव्हीटी घेणे नियोजित आहे त्याचा तपशील

3.याप्रमाणे परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यांनतर साधारण सात दिवसात प्राथमिक छाननी नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून करण्यात येईल आणि उक्त प्रकल्पासाठी ई-रजिस्ट्रेशन प्रणाली उपलब्ध करून देण्यास तत्वत: मान्यतेचे पत्र नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून देण्यात येईल.

4.याप्रमाणे मान्यतापत्र निर्गमित केल्यानंतर पुढील चार प्रक्रिया/कामे समांतर रितीने त्वरीत सुरू करण्यात येतील व मान्यता पत्र निर्गमित केल्यापासून 4 आठवडयाच्या आत पूर्ण करण्यात येतील.

4.1- संबंधित प्रकल्पासाठी ई-रजिस्ट्रेशन प्रणाली तयार करणे व त्याची चाचणी घेणे
4.2- बांधकाम व्यावसायिकाने MPLS-VPN कनेक्टीव्हीटी उपलब्ध करून घेणे
4.3- बांधकाम व्यावसायिकाने आपल्या नियोजित ठिकाणी आवश्यक साधनसामूग्री

स्थापित करून कार्यस्थळ तयार करणे

4.4- नोंदणी महानिरीक्षक कार्यालया व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र यांनी बांधकाम व्यावसायिकास किंवा त्यांने नामनिर्देशित केलेल्या तीन ते चार व्यक्तीना ई-रजिस्ट्रेशन प्रणाली वापरासंबंधात प्रशिक्षण देणे.

5. उपरोक्त पैकी 4.1 हे काम नोंदणी महानिरीक्षक कार्यालय व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र यांचेकडून संयुक्त रित्या व आवश्यकतेप्रमाणे बांधकाम व्यावसायिकाकडे नामनिर्देशित व्यक्तीच्या सहकार्याने पार पाडले जाईल. त्याचे साधारण स्वरूप व कालावधी सोबतच्या परिशिष्ठ 3 मध्ये दर्शविले आहे.

## **<u>परिशिष्ठ क्र.1</u>**

## ई-रजिस्ट्रेशनची साधारण पध्दत

### <u>Procedure of e-Registration</u>

1. Please get ready with minimum requirements for e-Registration.

   **Minimum Requirements**

   1. PC with updated Antivirus.
   2. Internet broadband connection of minimum 2 Mbps
   3. Web Camera
   4. Biometric Reader (Fingerprint reader)
   5. Aadhar card of all parties


   For detailed specifications of Web Camera and Biometric Reader, please refer to document 'Technical Note on e-Filing' on www.igrmaharashtra.gov.in

2. Visit www.igrmaharashtra.gov.in
3. Open e-Registration portal
4. Create your account in portal
5. Enter data required for preparing document & Verify all details
6. Auto calculation of Stamp Duty, Registration Fees and other charges from portal
7. Pay Stamp Duty, Registration Fees online
8. Check the Draft Document
9. Capture photographs & thumb impression of all the parties & their Identifiers
10. Validate your identity using your Aadhar number.
11. Upload the document for Registration
12. SRO will receive document in his log-in
13. SRO to verify identity of registrants with UID & payment details with GRAS
14. SRO will verify document & if found correct will register it using his Electronic Signature
15. Receive registered document, Index -2 ,& Receipt in your log-in

# परिशिष्ठ क्र.2

UID Verification

## SCREEN SHOTS OF ADHAR MESSAGE



**परिशिष्ठ क्र.3**

विक्री करारनाम्या ई-रजिस्ट्रेशन प्रणाली तयार करणे व त्याची चाचणी घेणे याचा कृती आराखडा

| अ.क्र. | काम | कालावधी |
|---|---|---|
| 1 | बांधकाम व्यावसायिकाने विक्री करारनाम्याच्या मसूदयाची Soft Copy व करारनाम्यासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची Soft Copy तसेच प्रकल्पातील इमारतीचा व सदनिकांचा तपशील दर्शविणारा तक्ता नोंदणी महानिरीक्षक कार्यालयास उपलब्ध करून देणे. | मान्यतापत्र दिल्यापासून 3 दिवसात |
| 2 | नोंदणी महानिरीक्षक कार्यालय व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र यांनी मसूदा व प्रकल्पाचा तपशील याचा प्राथमिक अभ्यास करणे | वरील नंतर 2 दिवसात (एकुणात 5 व्या दिवशीपर्यंत) |
| 3 | नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे प्रतिनिधी,राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र यांचे प्रतिनिधी व बांधकाम व्यावसायिक यांचे प्रतिनिधी यांची राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,पुणे येथे पहिली बैठक आणि त्यामध्ये मसूदा व प्रकल्प यासंदर्भात चर्चा,ई-रजिस्ट्रेशनसाठी आवश्यक प्राथमिक माहिती (Master) तयार करण्याबाबत चर्चा | क्रमांक 1 प्रमाणे मसूदा व इतर बाबी उपलब्ध बाबी करून दिल्यापासून तिस-या किंवा चौथ्या दिवशी (एकुणात 9 व्या दिवसापर्यंत) |
| 4 | बांधकाम व्यावसायिकाने Master साठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देणे | वरील बैठकीनंतर तिस-या दिवसापर्यंत (एकुणात 11 व्या दिवसापर्यंत) |
| 5 | राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,पुणे यांनी ई-रजिस्ट्रेशन प्रणालीचा पहिला डेमो दाखविणे आणि त्यावर चर्चा करणे | वरील क्रमांक 4 प्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यांनतर 7 व्या दिवसापर्यंत (एकुणात 18 व्या दिवसापर्यंत) |
| 6 | चर्चेअंती दिसून आलेल्या दुरुस्त्या करून अंतिम प्रात्याक्षिक दाखविणे. | पहिल्या डेमोनंतर 4 थ्या दिवसापर्यंत (एकुणात 22 व्या दिवसापर्यंत) |

| अ.क्र. | काम | कालावधी |
|---|---|---|
| 7 | बांधकाम व्यावसायिकाच्या नामनिर्देशित प्रतिनिधीने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,पुणे येथे चाचणी दस्त तयार करणे,नोंदणीस सादर करणे व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,पुणे यांच्या प्रतिनिधीने चाचणी पध्दतीने दस्त नोंदणी पूर्ण करणे इ.प्रकारे सर्वकष चाचणी करणे व आवश्यक असल्यास सुधारणा करणे | अंतिम प्रात्याक्षिकानंतर 2 –या दिवसापासून ते 5 व्या दिवसापर्यंत (एकुणात 27 व्या दिवसापर्यंत) |
| 8 | प्रणालीस नोंदणी महानिरीक्षक कार्यालय आणि संबंधित बांधकाम व्यावसायिक यांनी स्विकृती देणे व अंमलबजावणी सुरु करणे | अंतिम प्रात्याक्षिकानंतर 6 व्या दिवशी (एकुणात 28 व्या दिवसापर्यंत) |